# मुक्ताबाईद्वारे एका खऱ्या साधकाला मार्गदर्शन

## भारतातील एका प्राचीन कथेवर आधारित

तो दिवाळीचा सण म्हणजेच प्रकाशाचे पर्व होते. एक लहान मुलगी जिचे नाव मुक्ताबाई होते, ती राहत असलेल्या खेड्यातील बाजारात एका महत्त्वाच्या कामासाठी निघाली होती. दिवाळीचा सण असल्यामुळे ती, तिच्या कुटुंबातील लोकांसाठी पुरणपोळी बनवायचा विचार करत होती. तिचे आईवडील स्वर्गवासी झालेले असल्यामुळे आता मुक्ताबाईला असे वाटत होते की तिने तिचे तीन मोठे भाऊ — निवृत्ती, ज्ञानेश्वर आणि सोपान यांच्यासाठी हे खास पुरणपोळीचे जेवण बनवावे. ती पहिल्यांदाच पुरणपोळी बनवणार असल्यामुळे, त्या पुरणपोळ्या भाजण्यासाठी तिला मातीचा तवा खरेदी करायचा होता.

मुक्ताबाई जरी त्या खेड्यातील इतर मुलींसारखीच दिसत असली, तरी तिच्या शेजारी राहणारे लोक या बाबतीत अपरिचित होते की, ती तिच्या तीन्ही भावांप्रमाणेच एक सिद्ध, एक आत्मज्ञानी होती. ही किशोरवयीन सत्याची ज्ञाता दिवाळीच्या सणादरम्यान लोकांच्या चेहऱ्यावर चमकणाऱ्या आपुलकीला आणि सद्भावनेला दाद देत आपल्या  गावाच्या, आळंदीच्या रस्त्यांवरून स्मितहास्य करत जात होती. त्या छोट्या गावातील रस्ते दिवाळीच्या निमित्ताने फळे आणि मिठाई विकत घ्यायला आलेल्या लोकांमुळे तुडुंब भरलेले होते. मुक्ताबाईची भेट ज्या-ज्या लोकांशी झाली, त्यांनी तिला आनंदाने शुभेच्छा दिल्या. आणि मग तिची भेट त्या गावातील प्रसिद्ध ब्राह्मण विसोबा चाटी यांच्याशी झाली.

त्या खेड्यातील ही वयोवृद्ध व्यक्ती, ईश्वरप्राप्तीसाठीची अभिलाषा व्यक्त करण्यासाठी सनातन परंपरांचे पालन करत असे. आळंदीच्या इतर पुरोहित समाजाप्रमाणेच विसोबादेखील मुक्ताबाई आणि तिच्या भावांना नापसंत करत होते कारण त्यांच्या वडिलांनी, विठ्ठलपंतांनी युवावस्थेत लग्न केले होते आणि नंतर सुख प्राप्त न झाल्याने आपल्या पत्नीचा त्याग करून ते संन्यासी बनले होते. विठ्ठलपंतांच्या गुरूंना हे कळल्यानंतर त्यांनी या विठ्ठलपंतांना पुन्हा गृहस्थाश्रमात परत जाण्याची आज्ञा केली. त्यांना पाहून त्यांच्या पत्नीला आनंद झाला, पण त्या खेड्यातील रूढीवादी ब्राह्मण मात्र नाखूष झाले. त्यांना वाटत होते की, कोणत्याही कारणासाठी संन्यासधर्माचा त्याग करणे हे धर्माच्या विरूद्ध जाणे होते आणि त्यांच्या दृष्टीने तरूणाचे हे कृत्य संपूर्ण कुटुंबासाठी एक कलंक होता.

विसोबांनी जेव्हा मुक्ताबाईला त्या खेड्यामधून मुक्तपणे फिरताना पाहिले, तेव्हा त्यांनी विचार केला की, स्थानिक प्रथेनुसार या तरूण मुलीसोबत कोणीतरी प्रौढ व्यक्तीने असायला हवे होते. *हे कुटुंब नेहमीच काहीतरी चूकीचे करत असते,* ते स्वतःशीच बडबडू लागले. *असो, मीच काहीतरी करतो!* त्यांनी मुक्ताबाईला विचारले, “कुठे निघाली आहेस तू?”

“मी दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने पुरणपोळी बनवण्यासाठी तवा खरेदी करण्यासाठी जाते आहे,” ब्राह्मणाकडे स्मितहास्य करत मुक्ताबाईने उत्तर दिले.

विसोबांचे समाधान झाले नाही. “तुझ्यासारख्या तरूण मुलीने एकटीनेच असे गावात फिरू नये.”.

“गावातून एकटीने फिरताना मला माझी काळजी वाटत नाही,” मुक्ताबाई म्हणाली. “इथे मला प्रत्येकजण ओळखतो. आणि माझ्या भावांना माहिती आहे की मी कुठे आहे.”

विसोबा संतापले. “स्वतःपेक्षा मोठे असलेल्यांशी उलटून बोलतेस?”

मुक्ताबाईला विसोबाबद्दल अपार करूणा वाटत होती कारण तिला माहीत होते की ते एक खरे साधक आहेत. ती त्यांना अशा प्रकारे समजावू पाहात होती की ज्यामुळे धार्मिक असहिष्णुतेवर मात करून त्यांनी स्वतःची समज विकसित करावी. परंतु, ती मुलगी काही बोलण्याआधीच विसोबा घाईघाईने पुढे निघून गेले. काही वेळानंतर, मुक्ताबाई पुन्हा कुंभाराच्या दुकानाकडे जाण्यास निघाली. ती दुकानात पोहोचली तेव्हा तिने विसोबांना त्या दुकानातून बाहेर पडताना पाहिले. ते इथे कशासाठी आले होते? लवकरच तिला ते कळून चुकले.

कुंभाराने तिला सांगितले की, तो तिला तवा विकू शकत नाही. तिने शांतपणे त्याच्या सबबी ऐकून घेतल्या — त्याला तवे विकण्याची एक मोठी ऑर्डर मिळाली आहे, त्याच्या स्वतःच्याच पत्नीला एक आणखी तवा हवा आहे, तो मुलांना काहीही विकू शकत नाही. तिने घरी जाताना रस्त्यातच तवा फोडला तर मग काय होईल!

मुक्ताबाईला समजून चुकले की, कुंभाराच्या नकार देण्याला विसोबाच कारणीभूत होते. त्या प्रभावशाली ब्राह्मणाने कुंभाराला नक्कीच धमकी दिली असावी, जेणेकरून तो तिला हवा असलेला तवा विकत नव्हता. या क्षणी काहीही करण्याजोगे नाही हे लक्षात आल्याने मुक्ताबाई घरी परत आली आणि आपल्या भावांची वाट पाहात राहिली.

तिच्या दोन नंबरचे भाऊ, ज्ञानेश्वर प्रथम घरी आले. त्यांना पाहिले की, मुक्ताबाई दरवाजातच बसली आहे. तिने तवा विकत घ्यायला गेल्यावर घडलेल्या गोष्टीविषयी सांगितले. ती म्हणाली, "विसोबाला वाटले की, त्यांनी मला तवा देण्यापासून कुंभाराला थांबवले पाहिजे आणि तव्याशिवाय, मी दिवाळीसाठी पुरणपोळ्या बनवू शकणार नाही".

मुक्ताबाई सांगत असताना, विसोबा त्या मुलांच्या घराच्या खिडकीजवळ आले. कदाचित त्यांना असे वाटले असावे की त्यांनी काहीतरी जास्तच केले . . . किंवा नवीन तवा न मिळाल्यामुळे मुले आता काय करतात ते त्यांना पाहायचे होते. काहीही असो, त्यांनी जे पाहिले त्यामुळे त्यांचे जीवन रूपांतरित झाले.

मुलीला आणि तिच्या भावाला याची पूर्णतया जाणीव होती की, ब्राह्मण त्यांना पाहातो आहे, आणि मौनपणे ते एकमेकांशी सहमत झाले की, नवीन समज प्राप्त करण्यास त्यांनी त्याला मदत करावी.

ज्ञानेश्वर मग म्हणाले, "परंतु मुक्ता, तुला पुरणपोळी करण्यासाठी तव्याची गरजच काय आहे? तू माझ्या पाठीवर पोळ्या भाजू शकतेस!" *त्याच्या पाठीवर पोळ्या भाजायच्या!* आश्चर्यचकित झालेल्या विसोबांनी पाहिले, ज्ञानेश्वर आपल्या गुडघ्यांवर आणि हाताच्या कोपरांवर वाकले होते आणि मुक्ताबाईने त्यांच्या पाठीवर छोट्या गोल पोळ्या टाकायला सुरुवात केली. उष्णतेने पोळ्या भाजल्या जाऊन खरपूस सोनेरी झाल्या. लवकरच मुक्ताबाईजवळ कुरकुरीत गरम पोळ्यांचा ढीग जमा झाला.

विसोबांनी जाणले की, त्यांनी दिव्य चमत्कार पाहिला आहे आणि तो चमत्कार म्हणजे ज्ञानेश्वरांची लीला आहे. ज्ञानेश्वरांप्रति त्या ब्राह्मणाचा दृष्टिकोन बदलला. धार्मिकतेच्या पूर्वग्रहांपासून मुक्त होऊन आता त्यांनी हे पाहण्यास सुरुवात केली की ज्ञानेश्वरांच्या स्मित हास्यामध्ये प्रज्ञान व करूणा सामावलेली आहे. विसोबांच्या आता हे लक्षात आले की, ज्ञानेश्वर एक सिद्ध महात्माच आहेत. विसोबा स्वतः ही आत्मज्ञानाची स्थिती प्राप्त करण्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्न करत होते, पण व्यर्थ. ब्राह्मणाने विचार केला, *हा तरूण माझ्याप्रमाणे याच खेड्यात आयुष्यभर राहातो आहे. वर्षानुवर्षे मी त्याच्या महानतेविषयी अपरिचित राहिलो.*

स्वयंपाक करताना मुक्ताबाईने विसोबांना धाप लागलेली ऐकली होती आणि आता तिने त्यांना खिडकीतूनच बोलावले. "विसोबा, तुम्हीच आहात ना? माझ्या पुरणपोळ्या झाल्या आहेत. आत येऊन एखादी पोळी खाऊन बघाल का?"

घरात पाऊल टाकणाऱ्या विसोबांचे संपूर्ण परिवर्तन झालेले होते. हात जोडून नमस्कार करत ते ज्ञानेश्वरांना म्हणाले, “मला जाणीव झाली आहे की, मला तुमच्यापासून शिकण्यासारखे बरेच काही आहे. आपला शिष्य म्हणून कृपया माझा स्वीकार करा.”

ब्राह्मणाने मुक्ताबाईकडे पाहिलेदेखील नाही, जरी तिनेच त्याला आत येण्याचे निमंत्रण दिले होते. ज्ञानेश्वरांनी स्मितहास्य केले आणि एका आत्मज्ञानी गुरूंच्या परिपूर्ण करूणेने त्यांनी आपल्या लहान बहिणीकडे अंगुलीनिर्देश करून ब्राह्मणाला सांगितले, “तुम्ही तिचे शिष्य बनू शकता.”

विसोबांना आश्चर्याचा धक्का बसला. छोटी मुलगी! त्यांची गुरू होणार! परंतु त्यांनी जेव्हा तिच्या प्रज्ञानाने, दयाळूपणाने भरलेल्या डोळ्यांत पाहिले, तेव्हा त्यांना त्या डोळ्यांत ओळखीची चमक दिसली. त्या विद्वान वयोवृद्धाला उमगले की, लहान असूनही मुक्ताबाई एक आत्मज्ञानी सिद्ध आहे, आणि तिच्याप्रतिच्या भक्तिभावाने त्यांचा ऊर भरून आला.

ब्राह्मणाने त्या लहान मुलीला आदराने वाकून नमस्कार केला जिला त्यांनी नुकतेच गावातील रस्त्यावर खडसावले होते. ते म्हणाले, “आज सकाळच्या माझ्या वर्तणूकीबद्दल मी दिलगीर आहे. कृपा करून मला माफ कर, आणि तुझा विनम्र शिष्य म्हणून माझा स्वीकार कर.”

त्याच्या उत्कंठेचा खरेपणा ओळखून, मुक्ताबाईने कृपापूर्वक मान डोलावली. कालांतराने, तिच्या कृपेने आणि तिच्या मार्गदर्शनाचे अनुसरण केल्याने, विसोबांना आत्मसाक्षात्काराची प्राप्ती झाली आणि ते स्वतःच इतर महान संतांचे गुरू झाले.

आजच्याच दिवशी, विसोबांनी त्या कुटुंबासह दिवाळीच्या मेजवानीत सहभाग घेतला होता — आणि पुरणपोळ्यांचा जास्त आस्वाद त्यांनीच घेतला होता!

रचना कैरॉन द्वारे पुनर्कथन

चित्रण : लुसील्डा दासर्डो कूपर

© २०१४ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®| सर्वाधिकार सुरक्षित.